Reading Passage 1

## सोफी जर्मेन

अठराव्या शतकात फ्रान्समध्ये सोफी जर्मेन नावाची असामान्य स्त्री होऊन गेली. वडीलांच्या पुस्तक संग्रहातून पुस्तके वाचून तिने गणित, ग्रीक आणि लॅटिन या विषयांचा अभ्यास केला. त्या काळात स्त्रियांना गणित शिकण्याचा हक्क नव्हता. सोफी जर्मेनला गणित खूप आवडत होते. पण हा विषय स्त्रियांचा नाही अशी तिच्या आईवडिलांची ठाम समजूत असल्यामुळे ते तिला विरोध करीत असत. रात्री तिने गणिताचा अभ्यास करू नये म्हणून मेणबत्त्या लपवून ठेवत असत. पण तिची जिद्द पाहून अखेरीस त्यांनी तिला गणित शिकायची परवानगी दिली.

पण प्रश्न होता शिकायचे कुठे? एका गणित शिकवणाऱ्या संस्थेत तिने प्रवेश घेण्याचा प्रयत्न केला. पण तिला प्रवेश नाकारला गेला.

झाले असे की त्या संस्थेत शिकणारा एक मुलगा काही दिवसांपूर्वी आजारी पडून मरण पावला होता. संस्थेला त्याबद्दल अजिबात कल्पना नव्हती. सोफीने त्याचे नाव घेतले आणि पुरुषाच्या वेषात ती तिथे जाऊन गणित शिकू लागली. तो मुलगा फार हुशार नव्हता. पण सोफी आल्यानंतर तो अचानक इतका हुशार कसा झाला हे तेथील शिक्षकांना कळेना. शेवटी एक दिवस खरा प्रकार उघडकीस आला.

त्या शिक्षकांना सोफीचे एवढे कौतुक वाटत होते की ते अजिबात चिडले नाहीत उलट त्यांनी सोफीला गणित शिकायला प्रोत्साहनच दिले.

सोफीने गणित शास्त्रात केलेलेल्या कामचा उपयोग आजही होतो आहे.

Reading Passage 1-Questions

प्रश्न१: सोफी जर्मेनला असामान्य स्त्री असे का म्हंटले आहे?

प्रश्न२: मुलींनी गणित हा विषय शिकण्याबद्दल सोफीच्या आईवडिलांचे काय मत होते व ते कशावरून कळते?

प्रश्न३: सोफीने मोठ्या संस्थेत गणित शिकण्यासाठी कोणता मार्ग काढला?

प्रश्न४: उतारा वाचून सोफीचे कोणते चांगले गुण लक्षात येतात?

प्रश्न५: पूर्वीच्या काळी स्त्रियांना आणखी कोणकोणत्या गोष्टी करायची परवानगी नव्हती?

## मार्टिन लुथर किंग

मार्टिन लुथर किंग हे अमेरिकेतील एक महान नेते होते. आफ्रिकन अमेरिकन लोकांना इतरांसारखेच मानाने जगता यावे यासाठी मार्टिनने आयुष्यभर कष्ट घेतले.

तल्लख बुद्धीच्या मार्टिनने बोस्टन मध्ये उच्च शिक्षण घेत असताना महात्मा गांधी आणि त्यांच्या कामाचा सखोल अभ्यास केला व अहिंसा म्हणजे काय हे जाणून घेतले. कोणतेही शस्त्र न वापरता, कोणावरही हल्ला न करता, व कोणाचेही नुकसान न करता, म्हणजेच कोणतीही हिंसा न करता, आपल्या हक्कांसाठी लढता येते, हे गांधींचे म्हणणे त्यांना पटले. पुढे त्यांच्या सिव्हिल राईट्सच्या लढ्यात शांती, प्रेम आणि अहिंसा हे तीन गुण डॉक्टर किंग यांनी कसे कायम जपले, ते एका घटनेवरून आपल्याला समजेल.

एकदा एका जाहीर सभेत ते बोलत असताना त्यांच्या दिशेने एक बूट फेकला गेला. सगळीकडे गोंधळ माजला. पण मार्टिन लुथर किंग अगदी शांत होते. त्यांनी तो बूट प्रेमाने उचलला, लोकांसमोर धरला आणि म्हणाले,

" आपल्या देशात खूप उदार लोक आहेत व त्यापैकी एकाने हा बूट फेकला आहे. कारण त्याला अनवाणी चालणाऱ्या गरीबांबद्दल दया वाटते आहे. माझी त्याला अशी विनंती आहे की त्याने याच्या जोडीचा दुसरा बूट फेकून एका गरिबावर कृपा करावी. मी त्याचे उपकार कधीही विसरणार नाही. ”

असे होते मार्टिन लुथर किंग जुनिअर, त्यांचा कोणी अपमान जरी केला तरी ते स्वतःचा तोल जाऊ देत नसत. अशा व्यक्तीला नोबेल पीस प्राईझ मिळाले यात नवल काय!

Reading Passage 2-Questions

प्रश्न१: मार्टिन लुथर किंग यांना महान नेते का मानले जाते?

प्रश्न२: मार्टिनवर कोणाचा प्रभाव पडला?

प्रश्न३: समान हक्कासाठी लढताना मार्टिनने कोणते तीन गुण जपले?

प्रश्न४: मार्टिन लुथर यांना कोणते पारितोषिक मिळाले?

प्रश्न५: तुमच्या मते थोर नेत्यामध्ये कोणते तीन गुण असणे महत्त्वाचे आहे?

Listening Passage 1-

गुढीपाडवा सणाच्या गोष्टी

हिंदू नवीन वर्षाचा पहिला दिवस म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा. या दिवशी ब्रह्माने सृष्टी निर्माण केली व पुढे याच दिवशी प्रभू श्रीराम विजयी होऊन अयोध्येत परतले असे मानतात. याच तिथीला इसवी सन (AD) ७८मधे शालिवाहन शक सुरू झाले.

भारतातील अत्यंत शूर राजा शालिवाहन याने चैत्र शुद्ध प्रतिपदेला, बलाढ्य शत्रूंना युद्धात हरवून, मोठा विजय मिळवला. शालिवाहन राजाने या दिवशीपासून नवीन कालगणना सुरू केली व तेव्हापासून पुढील वर्षांचा क्रम मोजला जाऊ लागला- ह्याला म्हणतात शालिवाहन शक.

शालिवाहनाचे खरे नाव शातकर्णी होते. त्यांच्या वडिलांचा मृत्यु होताच शातकर्णी आणि त्याची आई गौतमी हिला तिच्या परिवाराने घरातून बाहेर काढले. ते दु:खी मायलेक पैठण या गावी पोचले. तिथे एका म्हाताऱ्या कुंभाराने शातकर्णी व गौतमी या दोघांची दया येऊन, आपल्या घरी राहू दिले व लहान शातकर्णीला चाक फिरवून मातीची भांडी बनवायला शिकवली. एके दिवशी एक साधू त्या कुंभाराच्या झोपडीजवळ आला व पाणी मागू लागला. शातकर्णीने त्याची मनापासून सेवा केली. साधू शातकर्णीकडे बघून म्हणाला, " तू एक दिवस पराक्रमी राजा होशील". कुंभाराला व गौतमीला साधूने सांगितलेली गोष्ट खरी होईल असे मुळीच वाटले नाही पण छोट्या शातकर्णीचा मात्र साधूच्या शब्दावर विश्वास बसला. त्याने मातीच्या मूर्ती घडवून हत्ती, घोडे आणि सैनिक बनवले आणि आपल्या मित्रांबरोबर लढाईचा खेळ खेळू लागला. त्याच्या आवडत्या शालीवृक्षाच्या फांदीवर बसून तो म्हणे, " मी राजा आहे आणि हे माझे वाहन." शालीच्या झाडाला स्वत:चे वाहन म्हणतो, म्हणून शातकर्णीचे मित्र त्याला गंमतीने, " *महाराजा शालिवाहन*, यांचा विजय असो," असे म्हणत आणि शालिवाहन ह्याच नावाने लोक त्याला ओळखू लागले.

हा कुंभाराच्या घरी वाढलेला, गरीब, अनाथ मुलगा, मोठा होऊन महापराक्रमी शालिवाहन राजा झाला.

Listening Passage 1- Questions

प्रश्न१: उताऱ्यात गुढीपाडवा सणाबद्दल कोणत्या गोष्टींचा उल्लेख केला आहे?

प्रश्न२: शातकर्णी कोण होता?

प्रश्न३: शातकर्णीला शालिवाहन हे नाव कसे पडले?

प्रश्न४: शालिवाहनाच्या गोष्टीवरून आपल्याला कोणती शिकवण घेता येईल?

प्रश्न ५: आपल्या सणांबद्दल शिकणे का महत्त्वाचे आहे? कोणतीही दोन करणे सांगा.

Listening Passage 2-

झाडाचे पान

झाडाचे पान म्हणजे, निसर्गाचा चमत्कार. एखाद्या झाडाचे पान कधी बारकाईने पाहिले आहे का? पानाची मुख्य शीर आणि त्यापासून फुटणाऱ्या छोट्या शिरांचे जाळे पाहिले तर तेही एखाद्या झाडासारखेच दिसते. अगदी झाडात झाड असल्यासारखे!

प्रत्येक झाडाच्या पानाचा रंग किती वेगळा! कधी पोपटी तर कधी गर्द हिरवा, कधी काळपट हिरवा तर कधी जांभळट, विटकरी, लालचुटुक, तर कधी चक्क पिवळा. फॉल सीझनमधील पिवळी, केशरी, तांबडी झालेली झाडे आपण पाहतो. पानांना हे तऱ्हेतऱ्हेचे रंग कुठून येतात?

पानांचे मुख्य काम म्हणजे सबंध झाडाला अन्न पुरवणे. पाने जशी अनेक प्रकारची- कमळाची मोठी गोलाकार पाने, पाईनची सुयांसारखी, कॅक्टसची काटेरी, लाजाळूची उघड-बंद होणारी तसेच त्यांचे विविध उपयोग आहेत.

आपण पाल्याची भाजी करतो व कढीपत्ता, कोथिंबीर, पुदिना यांसारखी कितीतरी पाने स्वयंपाकात वापरतो. सणाच्या दिवशी केळीच्या पानावर जेवतो आणि मस्त जेवण झाल्यावर विड्याचे पान खातो. गवताच्या काड्यांनी विणलेल्या चटया व झोपड्यांची छपरे बनवतो तर काही पानांपासून औषधे बनवतो. बेल आणि दुर्वांची पाने पूजेसाठी, आंब्याच्या डहाळया तोरणासाठी व केवडा आणि लव्हेंडरची पाने सुगंधासाठी वापरतो. पक्षी व प्राणी झाडाच्या पानांमध्ये आसरा घेतात.

शिशिरात जेव्हा झाडाची पाने गळतात तेव्हा झाडाचा नुसता सापळा दिसतो पण वसंत ऋतूत त्यांना पालवी फुटते आणि पुन्हा एकदा झाडे पानांनी गच्च भरून जातात. निसर्गातली ही आश्चर्ये समजण्यासाठी झाडांचे शास्त्र म्हणजेच वनस्पतीशास्त्र शिकायाला हवे.

Listening Passage 2- Questions

प्रश्न१: उताऱ्यामध्ये, ‘झाडात झाड’ असे कोणत्या अर्थाने म्हंटले  आहे?

प्रश्न२: तुम्ही पाहिलेल्या रंगीत पानांचे वर्णन करा.

प्रश्न३: पानांचे मुख्य काम काय आहे?

प्रश्न४: पानांचे  कोणकोणते उपयोग आहेत?

प्रश्न५: वनस्पती शास्त्र का शिकायला हवे?